कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
(उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)
छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, 6 वा माळा,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-400001
Email-gardendept.nmc@gmail.com


क्रमांक :- NMC/OWL/GRDN/2026-27/1468 दिनांक :- 14 /08/2026

प्रति,

कार्यकारी अभियंता (प्रकल्प)
नागपूर महानगरपालिका, नागपूर

विषय :- ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पातील भूखंड क्र. 4, खामला, नागपूर येथील मोकळ्या भूखंडावरील प्रस्तावित विकास कामाच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणारी झाडे.

संदर्भ :- कार्यालयास प्राप्त आपले दिनांक 26.11.2024 चे पत्र.

वरील पत्रान्वये मोक्यावर जाऊन झाडाची/ झाडांची पाहणी करून झाडाच्या/झाडांच्या स्थितीचे निरीक्षण केले असता –

**मा. आयुक्त तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती यांनी दिनांक 14.05.2026 रोजी सभेत दिलेल्या मंजुरी** अन्वये आपणास खालील झाडे कापणी करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

**ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पातील भूखंड क्र. 4, खामला, नागपूर येथील मोकळ्या भूखंडावरील प्रस्तावित विकास कामाच्या नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन (हेरीटेज) पेल्ट्राफार्म-1, बाभूळ-4, रेनट्री-10 व नॉन हेरीटेज पेल्ट्राफार्म-24, कडूनिम-1, बाभूळ-10, चिचवा-2, गुलमोहर-1, जंगली करंजी-3, सुबाभूळ-1, रेनट्री-8, रिठा-2 अशी एकूण (15+52=67) नग झाडास जमिनीपासून कापणी करण्याची आपणास परवानगी देण्यात येत आहे.**

1. आपणास परवानगी पत्रात उल्लेखलेल्या झाडाव्यतिरिक्त इतर प्रजातीची झाडे / झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी करण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.
2. आपणास झाड/झाडे/झाडांच्या कापणी /फांद्या स्वखर्चाने व स्वतःच्या जबाबदारीवर कापणी/छाटणी कराव्या लागतील. झाड/झाडे/ कापणी करतांना रहदारीला अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.
3. **तोडण्यात येणाऱ्या 67 नग झाडाऐवजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021/आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट–कलम (4) (ब) अन्वये तोडण्यात येणाऱ्या त्याच जातीची किंवा इतर कोणत्याही मूळ जातीची तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजित केलेल्या वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान सहा फुट इतक्या उंचीची 2610 नग नविन झाडांची लागवड करावी. पोट-कलम (5अ) अन्वये लागवड करण्यात येणारी झाडे आपणास कमीत कमी सात वर्षाच्या कालावधी करिता जगवावी लागेल. या कालावधीत झाडे न जगल्यास तितक्याच संख्येतील झाडांची लागवड करून त्याची हानीपुर्ती (भरपाई) करण्यात यावी. तसेच लागवड करण्यात आलेल्या झाडाचा फोटोसह अहवाल दर सहा महिन्यात कार्यालयास सादर करावा.**
4. सदर परवानगी पत्रानुसार व नमूद केलेल्या अटीनुसार झाड/झाडे/झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी कराव्या लागतील अन्यथा महाराष्ट्र (शहरी क्षेत्र) वृक्षजतन (सुधारित) अधिनियम 1975 अन्वये आपल्यावर कार्यवाही करण्यात येईल.
5. **वृक्ष तोडण्याची परवानगी दिल्यापासून 15 दिवसानंतरच वृक्ष तोडण्यात यावे.**
6. वृक्ष प्रत्यारोपण (Transplant) करण्याकरिता तांत्रिक सल्ला आवश्यक असल्यास उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, म.न.पा. नागपूर ला संपर्क साधावा.
7. परवानगी देऊनही झाडास कापणी किंवा झाडाच्या फांद्या न कापणी केल्यास झाड किंवा झाडाची फांदी पडून जीव व वित्तहानी झाल्यास सर्वस्वी जवाबदारी आपली राहील. कृपया याची नोंद घ्यावी.
8. **परवानगी पत्रात नमूद वृक्षाव्यतिरिक्त हेरीटेज तसेच नॉन हेरीटेज वृक्ष असल्यास आपण या वृक्षाची कापणी करू नये. इतर वृक्षाची कापणी केल्यास महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021/आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 8 मुख्य अधिनियमाच्या कलम 21 मधील पोट–कलम (1) मध्ये एक हजार रुपयापेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या या मजकुराऐवजी शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल, अश्या पद्धतीचा वापर करून काढलेल्या झाडाच्या मुल्याइतके परंतु 1,00,000/- रुपयापेक्षा कमी नसेल इतक्या रकमेचा मजकूर दाखल करणायत येईल. कृपया याची नोंद घ्यावी.**
9. सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे S.M. PIL No. 10/2026 नुसार प्रकरण दाखल असून पर्यायी वृक्ष लागवड झाल्यानंतरच परवानगी देण्यात येईल. असे प्रतिज्ञापत्र म.न.पा. द्वारे दाखल करण्यात आली आहे.
10. ह्याबावत मा. उच्च न्यायालयाचे आदेश अर्जदार व संबंधितास बंधनकारक राहतील व ह्यास अधीन राहून अर्जदारास परवानगी देण्यात येत आहे.

टिप :- अ) झाडे तोडण्याकरिता महानगरपालिकेचे अधिकृत ठेकेदार नसून कोणत्याही ठेकेदारास झाडे तोडण्याचा परवाना दिलेला नाही.

O/C

वृक्ष संवर्धक
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :- 1) वनपरिक्षेत्र सेमिनरी हिल्स, नागपूर यांना माहितीकरिता सादर.
2) मे. प्रफुलवेद इन्फ्रा प्रा. लि., 14-A, श्री क्रिष्णा रेसिडेंसी, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर.

Scanned with OKEN Scanner